# नियमित दिवाणी दावा क्र.१४२/२०१३ मधील नि.१०१ वरील आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज हा दाव्यामध्ये दुरुस्ती होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी वांग रेठरे येथील ३ मिळकती दाव्याच्या कामी सामील होवून मिळण्याकामी विनंती केली असून दावा कलम १अ मध्ये रिसनं ३३६/१अ मधील १२ खण मातीचे बांधकाम केलेल्या पत्र्याच्या व बंगलोरी कौलाचे घर समाविष्ट करण्याकामी विनंती केली आहे. तर दावा मिळकत १ब मध्ये ५ मिळकती दाखल करण्यासाठी विनंती केलेली आहे.

३. वादी यांनी दाव्याच्या सरनाम्यामध्ये प्रतिवादी क्र. १५ हिच्याविरुध्द वादींना कोणतीही मागणी करावयाची नसल्याने त्यांचे नांव दाव्याच्या कामातून कमी करण्याविषयी विनंती केलेली आहे. तसेच दावा मिळकतीमध्ये १ब मधील अनुक्रम क्रमांक २ मधील सिटीसर्व्हेनंबर १५२ व १३५ तसेच इतर दावा मिळकतीमध्ये वादी यांना स्वतंत्र वाटप करुन मागायचे नाही. त्यांना त्या मिळकतीमध्ये समाईकात वाटप करुन मिळाल्यास वादींची हरकत नाही अशा स्वरुपाची दुरुस्ती होवून मिळणेकामी वादी यांनी विनंती केलेली आहे. त्या अनुषंगाने इतर दुरुस्त्या मिळणेकामी त्यांनी अर्ज सादर केलेला आहे.

४. वादी यांच्या अर्जाला प्रतिवादी यांनी आपले म्हणणे नि.११६ वर दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे २९.११.२०१३ रोजी प्रतिवादींनी कैफियत दाखल केली असून एकत्र कुटुंबाच्या मिळकती दाव्याच्या कामी सामील नसल्याचे त्यांनी त्यात नमूद केले आहे. त्यानंतर दाव्याच्या कामी मुददे निघून वादींचे साक्षीदार तपासण्यात आले व त्यांचा उलटतपासही घेण्यात आलेला आहे. उलटतपास घेतल्यानंतर अशा प्रकारचा अर्ज दाखल

करुन वादी पुराव्यामध्ये घेतलेल्या कबुली खोडू पहात आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे सदर अर्जाला मुदतीच्या कायदयाची बाधा येते. तसेच कोणतेही कायदेशिर कारण असल्याशिवाय सदरचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे एखादया मिळकतीला नांव लागावे म्हणून दावा दाखल करता येत नाही. कारण एमएलआरसी कलम १४८ प्रमाणे त्याला बाधा उत्पन्न होते.

५. वादी यांचे विव्दान वकील श्री.डी.एन.घाडगे व प्रतिवादी यांचे विव्दान वकील श्री. पी. टी. जाधव यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर पुढीलप्रमाणे गुण या अर्जाच्या कामी काढण्यात येतात.

| अ.क | गुण | उत्तर |
|---|---|---|
| १ | वादी यांनी मागणी केलेली संभाव्य दुरुस्ती ग्राहय आहे काय? | होय |
| २ | काय हुकुम? | अंतिम हुकुमाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>गुण क. १ साठी</u>

६. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे सदर दाव्याच्या कामी आवश्यक असणारी कागदपत्रे त्यांना कालांतराने प्राप्त झाली. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज आता सादर केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दाव्याच्या कामी सर्व मिळकती सामील करणे आवश्यक असताना निव्वळ कागदपत्रे न मिळाल्याने ते दाखल करण्याचे राहून गेले. वादी यांना इतरही मिळकतीविषयी दुरुस्ती या दाव्याच्या कामी होवून मिळावी यासाठी सदरचा अर्ज त्यांनी

सादर केलेला आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे वादींना योग्य ती माहिती यापूर्वी असताना वादींनी त्याप्रमाणे कोणतीही दुरुस्ती दाव्याच्या कामी करुन मागितली नाही. दाव्याच्या कामी पुरावा नोंदल्यानंतर व पुराव्यामध्ये काही तफावती निर्माण झाल्यावर सदरचा अर्ज सादर केलेला आहे.

७. वादी यांचे विव्दान वकील यांनी या अर्जाच्या कामी –

*२०१६(१) व्हॉल्यूम एमएच.एल.जे. पान नंबर ७७० वरील केस राजाराम नाईक विरुध्द स्टेट ऑफ गोवा आणि इतर मधील न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला असून सदर न्यायनिर्णयाप्रमाणे दाव्यामध्ये केलेल्या कथनाच्या अनुषंगाने जर तांत्रिकदृष्टया दोष निरसन करण्याकामी जर दुरुस्ती मागितली असेल तर ती आवश्य मान्य करण्यात यावी. त्यामुळे वेगळया प्रकारे पुन्हा पुढील कार्यवाही उदभवू शकते. त्या विचारात घेवून ती मंजूर करण्यात यावी.*

८. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे सदरची विनंती जर मंजूर केली नाही तर वादी यांना त्याबाबत स्वतंत्र दावा करणे आवश्यक ठरु शकते व त्यामुळे इतरही कार्यवाही त्यांना दाखल करावी लागू शकते. त्यामुळे त्यांनी तो अर्ज मंजूर होणेविषयी विनंती केली आहे. प्रतिवादी यांचे विव्दान वकील यांनी युक्तीवाद सादर केला की वादींनी सादर केलेला न्यायनिर्णय पाहता त्या न्यायनिर्णयाप्रमाणे जी काही दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देणे आवश्यक आहे ती देताना ती योग्य मुदतीत व योग्य कारणास्तव दिली जात आहे काय हे पाहणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. वादींनी त्यांचा पुरावा झाल्यानंतर काही दुरुस्ती मागितली आहे. त्यामुळे ती योग्य आहे असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे वादींनी सादर केलेला न्यायनिर्णय हा त्यांच्याच विरोधात आहे.

९. वादी व प्रतिवादींच्यावतीने सादर केलेला युक्तीवाद ऐकल्यानंतर व दाव्याचे

स्वरुप जर पाहिले तर दावा हा वाटपासाठी असल्याचे दिसून येते. या दाव्याच्याकामी आवश्यक मिळकती सामील केल्या नसल्याबददलचा वाद कैफियत दाखल केली त्यावेळी प्रतिवादींनी उपस्थित केला असल्याचे दिसून येते. त्याच मिळकती या आता सामील करण्याविषयीचा अर्ज वादींनी सादर केलेला आहे. सदरचा दावा हा वाटपाविषयी आहे. त्यामुळे मुदतीचा कालावधी हा १२ वर्षाचा राहतो. त्यामुळे सदरचा अर्ज हा मुदतबाहय केला आहे असे म्हणता येवू शकत नाही. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांचा पुरावा नोंदविण्यात आला असून त्याचा उलटतपासही घेण्यात आला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या अनुषंगाने पुराव्यामध्ये ज्या काही तफावती नोंदवायच्या होत्या त्या यापूर्वी नोंदविण्यात आल्या आहेत. जर वादी याने पुढे जास्तीचा पुरावा दिला तरी उलट तपास घेण्याची मुभा ही प्रतिवादींना उपलब्ध आहे. या दाव्याच्या कामी सामील करण्यात येणा-या मिळकती पाहता त्या मिळकतीमध्ये जसा वादीचा हिस्सा आहे तसा प्रतिवादींचा पण हिस्सा आहे. त्यामुळे त्याविषयी स्वतंत्र दावा भविष्यात होण्यापेक्षा या दाव्याचा निकाल झाल्यास पुढील कार्यवाही स्थगित होवू शकते. त्यामुळे वादी यांनी दाखल केलेला अर्ज हा नियमबाहय आहे असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे गुण क्रमांक १ चे उत्तर होय म्हणून देण्यात येते.

१०. वादी यांनी सादर केलेला अर्ज पाहता तो फार उशिरा दाखल केला असल्याचे दिसून येते. दाव्याच्या कामी वादी यांचा पुरावा घेतल्यानंतर त्यांनी सदरचा अर्ज सादर केलाा असल्याचे दिसून येते. निश्चितच त्यामुळे प्रतिवादी यांना इतरही गोष्टींना सामोरे जावू शकते. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना २५०/- रुपये खर्च प्रत्येकी अदा करावा.

सही..

कडेगांव.
ता.१४.११.२०१६

**(वि.रा.घराळ)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव.**